# महात्मा फुले कृषि विद्यापीठ,
# राहुरी, जि . अहमदनगर

श्री. विजय कोते,
नियंत्रक

दुरध्वनी क्र. ०२४२६/२४३२२६ फॅक्स क्रमांक ०२४२६/ २४३२३८
E.mail : Comptmpkv@gmail.com


जा.क्र .मफुकृवि/नियंत्रक/अग्रिम/इंधन/ १५८ /२०१७ दिनांक :03/08/2017

## परिपत्रक

विषय :- इंधन अग्रीम कार्यपध्दतीमध्ये बदल करणे बाबत...
संदर्भ :- कुलसचिव यांचे पत्र.क्र.कृ.अ.म./इंधन/पे.पंप/४०५/२०१७. दि.०४.०३.२०१७.

मध्यवर्ती परिसरामधील सर्व आहरण व संवितरण अधिकारी हे प्रचलीत पध्दतीनुसार इंधन अग्रीमधन घेत असतात. मध्यवर्ती परिसरामधील कार्यालयांकडून इंधन अग्रीमाची देयके आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडून अधिदान व लेखा अधिकारी / अतिरीक्त अधिदान व लेखा अधिकारी यांचेकडे अदायगीसाठी पाठविण्यात येतात. सदर देयकांची अधिदान व लेखा अधिकारी / अतिरीक्त अधिदान व लेखा अधिकारी यांचेकडून धनादेशाद्वारे अदायगी करण्यात येते. सदर धनादेश आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडे दिल्यानंतर ते बँकेकडून रोख रक्कम ताब्यात घेऊन ज्या कार्यालयाचा इंधन अग्रीमधनासाठीचा प्रस्ताव आलेला असेल त्यांच्याकडे रक्कम हस्तांतरीत करतात. सदरचे कार्यालय रक्कम प्राप्त झाल्यानंतर वाहनांसाठी आवश्यक इंधन विद्यापीठाच्या अथवा अन्य पंपावरून भरून घेतात. सदरची प्रकियेमधे मोठ्या प्रमाणावर रक्कम रोख स्वरूपात विद्यापीठ निधीबाहेर राहते.

शासनाच्या कॅशलेस प्रणालीच्या धोरणानुसार इंधन अग्रिमधन प्रणालीमध्ये दि. ०१.०७.२०१७ पासुन बदल करण्यात येत आहे. मध्यवर्ती परिसरामध्ये एकुण ५१ हलकी वाहने विद्यापीठाचे वरिष्ठ अधिकारी यांचेकडे वापरात आहेत. सदर वाहनांसाठी वरीलप्रमाणे पूर्वीच्या कार्यपध्दतीनव्ये अग्रीम न देता विद्यापीठाच्या पंपावरून प्रत्येकी रक्कम रू.१०,०००/- पर्यंत क्रेडिट बिलाद्वारे पेट्रोल / डिझेल व ऑईल इत्यादीचा भरणा करता येईल. ज्या कार्यालयांची रक्कम रू.१०,०००/- पर्यंतची क्रेडिट बिले तयार होतील त्यांनी आहरण व संवितरण अधिकारी यांचे मार्फत (अग्रीम मर्यादा संपण्यापूर्वीच साधारणतः रू. ८०००/-ची क्रेडीट बीलांचे) देयकै तयार करून अधिदान व लेखा अधिकारी / अतिरीक्त अधिदान व लेखा अधिकारी यांचकडे पाठवावे. अधिदान व लेखा अधिकारी / अतिरीक्त अधिदान व लेखा अधिकारी यांनी सदरचे देयक प्राप्त होताच त्याची अदायगी विद्यापीठ पेट्रोलपंपाचे

(कृ.मा.प.)

ॲक्सीस बँक राहुरीमधील खाते क्रमांक ९१२०२००१६३५५६२६ मध्ये जमा करावी. या ५१ हलक्या वाहनांशिवाय (LMVs) इतर वाहने / स्वयंचलित यंत्रासाठी स्वतंत्र परिपत्रक काढण्यात येईल.

वरील व्यवस्था अंमलात आल्यानंतर इंधनाकरीता रोख अग्रिम देण्यात येणार नाही, याची सर्व संबंधीतांनी नोंद घेवून त्यानुसार वाहनाच्या वापराची व दौऱ्याची पुर्वनियोजन करून इंधन केवळ विद्यापीठाच्या पेट्रोल पंपावरच भरावे. अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत विद्यापीठ पंपाशिवाय इतरत्र इंधन भरावे लागल्यास त्याची रक्कम वैयक्तिक स्वरूपात रोखीने अदा करावी, त्याची प्रतिपूर्ती संबंधीताच्या व्यक्तिगत खात्यात थेट करण्यात येईल.

मा. कुलगुरू यांचे मान्यतेने.

सोबत : वाहनांची यादी

नियंत्रक,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ,
राहुरी.

प्रत माहितीकरीता व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी समादराने अग्रेषित.

१) संचालक, संशोधन शिक्षण विस्तार शिक्षण, मफुकृवि, राहुरी.
२) सहयोगी अधिष्ठाता (डॉ. अ.शि.कृ.अ.म.) / (नि.कृ.शि.), मफुकृवि, राहुरी.
३) सहयोगी अधिष्ठाता (प.म.), मफुकृवि, राहुरी.
४) नियंत्रक / विद्यापीठ अभियंता / उपकुलसचिव (प्रशासन) / (विद्या), मफुकृवि, राहुरी.
५) विभाग प्रमुख (सर्व), मफुकृवि, राहुरी.
६) प्रमुख शास्त्रज्ञ (बियाणे), वरीष्ठ शास्त्रज्ञ गो. सुधार प्रकल्प, मफुकृवि, राहुरी.
७) विद्यापीठ ग्रंथपाल / वैद्यकीय अधिकारी, मफुकृवि, राहुरी.
८) विद्यार्थी कल्याण अधिकारी, मफुकृवि, राहुरी.
९) प्रभारी अधिकारी प्रसारण, मफुकृवि, राहुरी.
१०) सर्व प्रभारी अधिकारी, मफुकृवि, राहुरी.
११) सर्व सहाय्यक कुलसचिव / सहाय्यक नियंत्रक / अधिदान व लेखा अधिकारी / अतिरीक्त अधिदान व लेखा अधिकारी (म.प.), मफुकृवि, राहुरी.
१२) कामगार कल्याण अधिकारी / सुरक्षा अधिकारी, मफुकृवि, राहुरी.
१३) मा. कुलगुरू यांचे स्विय सहाय्यक / कुलसचिव यांचे स्विय सहाय्यक / नियंत्रक यांचे स्विय सहाय्यक, मफुकृवि, राहुरी.
१४) कर्मशाळा अधिक्षक, मध्यवर्ती परिसर कार्यशाळा, मफुकृवि, राहुरी यांचे मार्फत प्रभारी व्यवस्थापक, पेट्रोल पंप, मफुकृवि, राहुरी.

२/- यांनी विद्यापीठाचे पेट्रोल पंपावर वाहन निहाय क्रेडीटवर इंधन दिल्याच्या नोंदी एका नोंदवहीत ठेवाव्यात.

१५) अधिदान व लेखा अधिकारी / अतिरीक्त अधिदान व लेखा अधिकारी (म.प.), मफुकृवि, राहुरी.

२/- पेट्रोल पंपावरील नोंदवहीशी वाहन निहाय खर्चाचा मासिक ताळमेळ नियमितपणे घ्यावा.